आदिवासी उपयोजना क्षेत्रात काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
आदिवासी विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक : आस्था-१०९३/प्र.क्र.२६१/का-१५
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ एप्रिल, १९९४.

वाचा :
१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र. टिएसपी-१०८९/८७१०/ प्र.क्र.३१/का-१५, दिनांक ९ मार्च, १९९०.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.आस्था-१०९२/प्र.क्र.५८/ का-१५, दिनांक २ मे, १९९२.
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.आस्था-१०९३/प्र.क्र.२०२/ का-१५, दिनांक ९ नोव्हेंबर, १९९३.
४) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.आस्था-१०९३/प्र.क्र.२६१/ का-१५, दिनांक २९ डिसेंबर, १९९३.

शासन निर्णय :

प्रस्तावनेतील दिनांक २९ डिसेंबर, १९९३ च्या आदेशान्वये शासनाने त्यात नमूद केलेल्या वर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्यामध्ये दर्शविलेल्या दराने प्रोत्साहन भत्ता मंजूर केला आहे. असा प्रोत्साहन भत्ता आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून निर्धारित केलेल्या ६,९७५ गावांत/शहरांत कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कृषि विद्यापीठे व कृषीतर विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेल्या महाविद्यालये यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन आता या आदेशान्वये आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून निर्धारित केलेल्या राज्यातील ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, नागपूर, भंडारा, यवतमाळ, चंद्रपूर आणि गडचिरोली या १४ जिल्ह्यातील एकूण ६,९६२ गावे व १३ शहरे अशा एकूण ६,९७५ गावांत कार्यरत असलेल्या व तेथे मुख्यालय असलेल्या कृषि विद्यापीठे व कृषीतर विद्यापीठे व त्यांना संलग्न असलेल्या महाविद्यालये यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक २९ डिसेंबर, १९९३ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या दराने दिनांक १ जानेवारी, १९९४ पासून प्रोत्साहन भत्ता लागू करीत आहे. हा प्रोत्साहन भत्ता दिनांक २९ डिसेंबर, १९९३ च्या शासन निर्णयात विहित केलेल्या शर्तींस अधीन राहील.

३. वरील बाबींवर होणारा खर्च हा संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकले जातात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा व त्या लेखाशीर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. हे आदेश वित्त विभागाच्या संमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३४१/९४/सेवा-५, दिनांक २०.४.१९९४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. द. कुलकर्णी,
सह सचिव, महाराष्ट्र शासन.
आदिवासी विकास विभाग.

एसडी/६१२२७